# मुंबई विद्यापीठ

परिपत्रक :- क्र. टीएएएस(सीटी) / २६ / २०२१-२०२२

प्रति,

प्राचार्य / संचालक,

सर्व संलग्नित महाविद्यालये / संस्था,

मुंबई विद्यापीठ.

**विषय : महाविद्यालयातील / संस्थेतील नियमित प्राचार्य / संचालक / शिक्षक / ग्रंथपाल / संचालक शारिरीक शिक्षण इत्यादींच्या पदोन्नतीची प्रक्रिया संगणकीकृत करणेबाबत.**

**संदर्भ** :१) संलग्नता / आयसीसी / २०१६-१७ / २३ दि. ३०/१२/२०१६

२) संलग्नता / आयसीसी / २०१६-१७ / २७ दि.२५/०१/२०१७

३) संलग्नता / आयसीसी / २०१६-१७ / २९ दि.१०/०२/२०१७

४) संलग्नता / आयसीसी / २०१६-१७ / ३० दि.२२/०२/२०१७

५) परिपत्रक क्र.- टीएएएस(सीटी) / ०२ / २०१७-१८ दि.०६/०५/२०१७

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयांकित संदर्भिय परिपत्रकांच्या अनुषंगाने आपणांस सूचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून शिक्षक नियुक्ती व मान्यता विभागांतर्गत देण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या मान्यतेबाबतची प्रक्रिया ऑनलाईन करण्यात आली आहे. तद्अनुषंगाने दि.१२/०५/२०१७ पासून पुढील काळात मुंबई विद्यापीठातील संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य / संचालक / शिक्षक / ग्रंथपाल / संचालक-शारिरीक शिक्षण इत्यादींचे पदोन्नतीचे आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पात्र शिक्षकांचे अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने विद्यापीठ स्विकारणार आले आहेत.

महाविद्यालयातील / संस्थेतील जे शिक्षक आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पदोन्नतीस पात्र आहेत व महाविद्यालयांना त्यांच्या पदोन्नतीकरिता मा. कुलगुरूंचे प्रतिनिधी व विषयतज्ञांची विद्यापीठाकडे विचारणा केली आहे. त्यांनी प्रत्येक शिक्षकांच्या पदोन्नतीकरिता सेवा शुल्क रु. ४९००/ - ऑनलाईन भरल्यानंतर संबंधित शिक्षकांच्या पदोन्नतीकरिता मा. कुलगुरूंचे प्रतिनिधी / विषयतज्ञ विद्यापीठामार्फत देण्यात येतील, अशा सूचना संदर्भीय क्र.५ नुसार देण्यात आल्या होत्या. त्यानुषंगाने आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पदोन्नतीस एका पेक्षा जास्त स्तरांसाठी पात्र असण्याऱ्या शिक्षकांद्वारे एकाच ऑनलाईन अर्जामध्ये आपल्या पात्र सर्व स्तरांची माहिती नमूद करून एकदाच अर्ज करणे अपेक्षित होते, परंतु विद्यापीठ प्रशासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, अशा शिक्षकांनी प्रत्येक स्तरासाठी वेगवेगळा अर्ज ऑनलाईन सादर केल्यामुळे त्यांनी वेगवेगळे अर्जनिहाय सेवा शुल्क रु. ४९००/- भरणा केलेले आहे. म्हणून सर्व शिक्षकांना पुनःश्च आवाहन करण्यात येते की,

१) ज्या शिक्षकांनी आपला एकही CAS अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारे सादर केलेला नसेल, असे अर्जदार यापुढील काळात आपला ऑनलाईन अर्ज ते पात्र असलेल्या सर्व CAS स्तरांसाठी एकाच ऑनलाईन अर्जामध्ये नमूद करू शकतील, यामुळे त्यांना आपल्या एका पेक्षा अधिक पदोन्नती स्तर नमूद असणाऱ्या ऑनलाईन अर्जासाठी फक्त एकदाच सेवाशुल्क रु. ४९००/- द्यावे लागेल.

२) तसेच, ज्या शिक्षकांनी आपला CAS अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारे एकदातरी सादर केलेला असेल अशा शिक्षकांना त्यांच्या पुढील पदोन्नतीसाठीचा अर्ज ऑफलाईन सादर करता येईल. सदर ऑफलाईन अर्ज संकेतस्थळावर उपलब्ध केला जाईल. ज्याचा उपयोग करून शिक्षक आपल्या पदोन्नतीचा/चे अर्ज या पुढील काळात नि:शुल्क सादर करू शकतील.

३) ज्या शिक्षकांनी त्याच्या CAS अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारे लागू असणारे सेवा शुल्क एका पेक्षा जास्त वेळेस भरले असतील, अशा शिक्षकांना त्यांच्या पहिल्या अर्जाचे सेवा शुल्क वगळून उर्वरित रक्कम परत करण्यात येईल.

ऑनलाईन अर्जाचा नमुना प्राप्त करण्यासाठी खालील संकेतस्थळावर भेट द्यावी.

https://muonline.org.in ⟹ College Teachers Approval Unit ⟹ Downloads

मुंबई -४०० ०३२
दिनांक- ७ मार्च, २०२२

कुलसचिव